विधान भवन
बॅकबे रेक्लमेशन
विधान भवन मार्ग
मुंबई ४०० ०३२

तारेचा पत्ता : विधानमंडळ
दूरध्वनी क्र. : २२०२ ७३ ९९
फॅक्स क्रमांक : २२०२ ४५ २४

# महाराष्ट्र विधानमंडळ

क्रमांक 9892 /म.वि.स./ ठा-१
दिनांक 22 JUL 2019

प्रति,

**विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे सर्व सन्माननीय सदस्य**

**विषय :- मनोरा आमदार निवास भूमीपूजन कार्यक्रमास उपस्थित राहण्याबाबत**

**महोदय,**

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, नव्याने बांधण्यात येणाऱ्या मनोरा आमदार निवास इमारतीचा भूमिपूजन कार्यक्रम मा.श्री.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते व मा.श्री.रामराजे नाईक-निंबाळकर, सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद; मा.श्री.हरिभाऊ बागडे, अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा; मा.डॉ.नीलमताई गोऱ्हे, उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद; मा.श्री.विजयराव औटी, उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा; मा.श्री.चंद्रकांत पाटील, मंत्री, सार्वजनिक बांधकाम; मा.श्री.सुधीर मुनगंटीवार, मंत्री, वित्त व नियोजन; मा.श्री.विनोद तावडे, मंत्री, संसदीय कार्य विभाग; मा.श्री.धनंजय मुंडे, विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद; मा.श्री.विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांच्या प्रमुख उपस्थितीत **बुधवार, दिनांक २४ जुलै, २०१९ रोजी सकाळी १०.३० वाजता मनोरा आमदार निवास भूखंड, मुंबई** येथे आयोजित करण्यात आला आहे.

त्यानंतर उपस्थित मान्यवरांची मनोगते व्यक्त करण्यासाठी उक्त भूमीपूजन कार्यक्रमानंतर सकाळी १०.५० वाजता मध्यवर्ती सभागृह, चौथा मजला, विधान भवन, मुंबई येथे समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

तरी उक्त कार्यक्रमास आपली उपस्थिती प्राथनीय आहे.

**आपला,**

**( जितेंद्र भोळे )**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

D:\AMDAR NIWAS\NBCC\BHUMI POOJAN LETT\Minister Invitition.docx